संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणूक रणधुमाळीत रणरागिणी कुठे?

**निवडणुकीच्या** रणधुमाळीमध्ये राजकीय प्रश्नांची बरीच मोठी निवड होत असते. पण मूलभूत अशा सामाजिक प्रश्नांचा तितक्या गांभीर्याने विचार होताना दिसत नाही. लोकशाहीच्या संवर्धनासाठी आणि भारतीय राज्यघटनेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे ही सगळी निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. सर्वच राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये आपापल्या पक्षाचा प्रचार करताना आपणच कसे या देशाचा राज्यकारभार पाहाण्यासाठी पात्र आहोत हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. या सर्व पक्षांच्या जाहीरनाम्यांचा जरी अभ्यास केला तरी त्यामध्ये मूलभूत अशा सामाजिक प्रश्नांच्या चिंतनाऐवजी मतदारांना आकर्षित करण्याचा खेळ केलेलाच दिसून येतो. अनेक प्रकारची आकर्षणे दाखवली जातात. खरे तर आकर्षणे म्हणजे एकाअर्थी मतदारांना मतांच्या मोबदल्यात लाच देण्यासारखाच प्रकार ठरतो. परंतु याच लोकशाहीच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या नावाखाली जाहीर नाम्यांमधून आमिषे दाखवण्याचा गैरप्रकारही खपवून घेतला जातो. खरे तर त्याला निवडणूक आयोगाने लगाम घातला पाहिजे. किंबहुना जाहीरनाम्यांचे स्वरुप कसे असावे याची काही मार्गदर्शक तत्त्वे तयार झाली पाहिजेत. देशाची राज्यव्यवस्था किंवा समाजव्यवस्था सुरळीत चालावी याकरिता जनता आपले प्रतिनिधी निवडून देते. पण ज्या समाजातून हे प्रतिनिधी निवडले जातात त्या समाजाच्या सर्व घटकांचे प्रश्न या निवडणुकीमधून चर्चिले जातात का किंवा त्यावरच्या उपायांविषयी अभ्यासपूर्ण मते मांडली जातात का याचा कोणीही विचार करीत नाही. आज घटनेने स्त्रीपुरुष या दोघांनाही समान अधिकार दिले आहेत. परंतु समाजातल्या या प्रमुख दोन घटकांनासुध्दा या निवडणुकांमध्ये समान प्रतिनिधीत्व मिळत नाही ही आज वस्तुस्थिती आहे. मग आपण ज्या समानतेच्या आणि समाजाच्या विकासाच्या गप्पा मारतो. त्या किती ढोंगी स्वरुपाच्या आहेत हे लक्षात येते. ५४३ खासदार लोकसभेसाठी निवडून दिले जातात. यातील ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असल्या पाहिजेत. अशी मागणी गेल्या पंचवीस वर्षांपासून होत आहे. त्याबाबतचे विधेयकसुध्दा लोकसभेत मांडले गेले परंतु ते अजूनही पारीत झालेले नाही.

### ओडिसा आणि बंगालचा पुढाकार

म्हणजे तिथे स्त्रीपुरुष लोकसंख्येच्या प्रमाणात किमान चाळीस टक्के जागा या महिलांसाठी आरक्षित असल्या पाहिजेत. त्याठिकाणी ३३ टक्केसुध्दा जागा द्यायला आजचे पुरुषप्रधान राजकारण तयार नाही. यावेळी मात्र प्रथमच ओडिसातल्या निवडणुकीसाठी बिजुजनता दलाने तब्बल चाळीस टक्के जागांवर महिला उमेदवार उभे करण्याचे घोषित केले. त्याच्यापाठोपाठ पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीदेखील पश्चिम बंगालमध्ये चाळीस टक्के जागांवर महिलांना उमेदवारी देण्याचा निर्णय जाहीर केला. संपूर्ण भारतातून केवळ दोनच राज्ये महिलांना पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणावर उमेदवारी देत आहेत. स्वातंत्र्यानंतरचा हा पहिलाच प्रकार ठरतो. देशातील अन्य प्रांतांमध्ये अशा प्रकारे किती पक्ष अनुकरण करतात. हेही आता बघायला हवे. किंबहुना राष्ट्रीय स्तरावरच्या राजकीय पक्षांनी तरी याबाबतचे आपले धोरण जाहीर करायला हवे. बेटी बचाव बेटी बढाव इथपासून महिलांच्या सक्षमीकरणाच्या अनेक योजना सरकारी पातळीवरून जाहीर झालेल्या आहेत. तर त्याच महिलांना राजकारणासारख्या क्षेत्रात सक्षम करणे हेदेखील या राजकीय पक्षांचे कर्तव्य ठरते. दुर्दैवाने महिलांबाबतचा हा दृष्टीकोन समाधानकारक नाही ही आज वस्तुस्थिती आहे. राष्ट्रपती महिला होणे किंवा काही महत्वाच्या पदांवर महिलांची वर्णी लागणे याचा अर्थ समाजातल्या सर्व महिलांना फार मोठा न्याय दिला गेला असे समजण्याचे कारण नाही. स्त्रीपुरुष समानता असे म्हणत असताना निवडणुकीच्या रणसंग्रामात या रणरागिणींनाही तेवढेच स्थान देण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. अजूनही भारतातले राजकीय क्षेत्र हे बऱ्यापैकी पुरुषप्रधान आहे, स्वाभाविकपणे समाजावरही त्याचा परिणाम होताना दिसतो. कदाचित म्हणूनच आज २१ व्या शतकातही महिलांना अनेक अत्याचारांचे आणि अन्यायाची शिकार व्हावी लागते. समाज सुशिक्षित असूनही महिलांवरच्या अत्याचाराचे प्रमाण कमी होत नाही. याचे कारण देशाच्या सार्वभौम सभागृहांमध्ये या महिला घटकाला या प्रमाणात सार्वभौमत्व दिले जात नाही. हा सामाजिक दृष्टीकोन सर्वच राजकीय पक्षांनी प्रामाणिकपणे स्वीकारला पाहिजे किंबहुना तो कृतीत आणला पाहिजे. देशाचा विकास प्रगती, समस्या या सगळ्या गोष्टींचे महत्व आहेच सामाजिक पातळीवर सर्व घटकांचे प्रतिनिधीत्व ही बाबदेखील निवडणुकीचा एक प्रमुख मुद्दा असली पाहिजे.

### युवकांबाबतही तेच

हाच प्रकार काही प्रमाणात युवक या घटकाबाबत होताना दिसतो. आज देशाच्या एकूण लोकसंख्येमध्ये अठरा ते चाळीस या वयोगटातील तरुणांची संख्या ६५ टक्के आहे. म्हणजे निम्म्यापेक्षा जास्त ते युवक आहेत. इतकी मोठी संख्या असल्याने सामाजिकदृष्ट्या या निवडणुकीत तरुण वर्गाला अधिक प्रतिनिधीत्व मिळणे गरजेचे ठरते. परंतु राजकारण हा जणू तरुणांचा प्रांत नाही अशापध्दतीने त्यांना बाजूला काढून ठेवले जाते. आणि साधारणपणे ४५ वर्षांपुढील प्रौढांना सर्वाधिक संख्येने सर्वच निवडणुकांमध्ये उमेदवारी दिली जाते. पण जर का प्रत्येक राजकीय पक्षाने वीस ते पंचवीस टक्के जागा या तरुणांना देऊ केल्या तर लोकसभेमध्ये शंभरपेक्षा जास्त तरूण खासदारांचा गट तयार होऊ शकतो. त्यांच्याकडे असलेली बुध्दीमत्ता उत्साह त्याच्या जोरावर एकूणच देशाचा सामाजिक आणि आर्थिक विकासही वेगाने घडवता येऊ शकतो. भारतीय तरुणांना राजकारणामध्ये योग्य वयात संधी दिली जात नाही आणि सध्याचे राजकारणाचे स्वरुप पाहून महिला आणि युवक वर्गसुध्दा राजकारणासाठी फारसा इच्छुक राहात नाही ही गोष्ट तितकीच खरी आहे. परंतु प्रयत्न केला तर आणि युवकांसाठी महिलांसाठी ओडीसा आणि बंगालप्रमाणे जागा राखून ठेवण्याचे धोरण राजकीय पक्षांनी जाहीर केले तर राजकारणात येणाऱ्या युवकांची संख्यादेखील वाढू शकेल. म्हणूनच लोकशाहीतला हा निवडणुकीचा सर्वात मोठा उत्सव पार पाडला जात असताना त्यात महिला आणि युवक हे प्रमुख घटक दुर्लक्षित केले जात असतील तर ज्या घटनात्मक बांधिलकीने निवडणुका घेतल्या जातात त्याच घटनेच्या समानतेच्या तत्वाला हरताळ फासण्याचे काम केले जाते असे म्हणावे लागेल.